सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २६ जुलै २०१९

### विविध जिल्ह्यांमधील ग्रामपंचायतींच्या प्रारूप मतदार याद्यांची २९ जुलैला प्रसिद्धी

मुंबई, दि. २६ (रानिआ): विविध जिल्ह्यांतील ६५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक; तर विविध ठिकाणच्या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी २९ जुलै २०१९ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, यात १ ऑक्टोबर ते १३ डिसेंबर २०१९ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ४८; तर नवनिर्मित १७ अशा एकूण ६५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसह रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी ही मतदार यादी तयार करण्यात येत आहे. विधानसभा मतदार संघाच्या १० एप्रिल २०१९ रोजी अस्तित्वात आलेल्या मतदार याद्या या निवडणुकांसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहेत. त्याआधारावर ग्रामपंचायतींच्या प्रारूप मतदार याद्या २९ जुलै २०१९ रोजी प्रसिद्ध केल्या जातील. त्यावर २९ ते ३१ जुलै २०१९ पर्यंत हरकती व सूचना दाखल करता येतील. अंतिम मतदार याद्या १ ऑगस्ट २०१९ रोजी प्रसिद्ध करण्यात येतील.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)